# भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

जा.क्र. १४६ /माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक २१/०३/२०१८

**१) पोस्ट ऑफीस मधील जमा असलेल्या रक्कमेची अफरातफर केल्याने गुन्हा नोंद :–**

दिंनाक ०१/०८/२०१७ चे पुर्वी वाजता दरम्यान यातील आरोपी लोकसेवकाने त्याचे पदाचा गैरवापर करुन त्याचे पोस्ट ऑफीस मध्ये जमा असलेल्या रक्कमे पैकी एकुण ६०,०००/–रु. चे नगदी तसेच १५६/–रु. पोस्टाची तिकीटे असे एकुण ६०,१५६/–रु. येवढया सरकारी रक्कमेची अफरातफर करुन स्वतःचे फायदया करीता वापरल्याचे फिर्यादीचे वरिष्ठा कडील चौकशी अहवालात आढळुन आल्याने त्याबाबत फिर्यादी मोरेश्वर व्यंकटराव लिखार वय ५४ वर्ष, रा. प्लॉट क्र. ८१ स्वरुप नगर नागपुर यांचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन पवनी येथे कलम ४०९ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. मस्के पोलीस स्टेशन पवनी हे करीत आहेत.

**२) ब्लेड व लाकडी टेबल मारुन दुखापत केल्याने गुन्हा नोंद :–**

दिंनाक २०/०३/२०१८ ते ११.२१ वाजता यातील फिर्यादी मधुकर नागोजी चाचेरे वय ५५ वर्ष, रा. सावरी मुरमाडी याचा मुलगा आकाश हा सचिनचे पानठेल्यात खर्रा घेण्यास गेला असता यातील आरोपीने त्यास शिवीगाळ केले आकाशने आरोपीस हटकले असता आरोपीने यास मारपीट केल्याने आकाश हा सांगत फिर्यादीकडे गेला फिर्यादी हा त्याचा मुलगा रोशन व आकाश सोबत आरोपीस हटकण्यास गेला असता आरोपीने ब्लेड ने फिर्यादीचे गालावर व फिर्यादीचा मुलगा रोशन याचे डावे हातावर दुखापत केले व फिर्यादीचा मुलगा आकाश याचे डावे हाताचे कोहणीवर लाकडी टेबल मारल्याने व त्याचे डावे कानाला ओरपडुन दुखापत केली व आरोपीने पुन्हा मारण्याची धमकी दिल्याने फिर्यादी यांचे तोंडी व डॉक्टरी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन लाखनी येथे कलम ३२४,५०४,५०६ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. काटेखाये पोलीस स्टेशन लाखनी हे करीत आहेत.

**३) अज्ञात व्यक्तीने मुलीचा खुन केल्याने गुन्हा नोंद :–**

दिंनाक २०/०३/२०१८ चे १७.४५ वाजता ते ३ दिवसा पुर्वी दरम्यान यातील फिर्यादीचे हा बापु नगर येथे घरी किरायाने राहणारे गोलु देशमुख वय २८ वर्ष, फुटाना यांचे रुम मध्ये रोशनी देशमुख वय २१ वर्ष हिचा कोणीतरी अज्ञात आरोपीने गळा आवळुन खुन केल्याने फिर्यादी मनोज श्रीरामजी सिरसागर वय ३२ वर्ष, रा. बाजार वार्ड लाखनी यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन लाखनी येथे कलम ३०२ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोनी. सोरसे पोलीस स्टेशन लाखनी हे करीत आहेत.

**४) अश्लिल शब्दात शिवीगाळ करुन मारण्यापिटण्याची धमकी दिल्याने गुन्हा नोंद :–**

दिंनाक २०/०३/२०१८ चे ०७.१५ वाजता दरम्यान यातील आरोपीने फिर्यादीस तु आमची पो. स्टे ला तक्रार दिली होती असे म्हणुन चिडुन फिर्यादी ही आपले आई सोबत घरा समोर ऊभी असतांनी आरोपी याने फिर्यादीस अश्लिल शब्दात शिवीगाळ करुन मारण्यापिटण्याची धमकी दिल्याने फिर्यादी यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन जवाहरनगर येथे कलम २९४,५०६ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सफौ. कांबळे पोलीस स्टेशन जवाहरनगर हे करीत आहेत.

**५) संगनमत करुन अश्लिल शब्दात शिवीगाळ करुन मारण्या पिटण्याची धमकी दिल्याने गुन्हा नोंद :–**

दिंनाक २०/०३/२०१८ चे ०८.३० ते १०.०० वाजता दरम्यान यातील फिर्यादी व आरोपी यांचे एकमेकांचे शेता जवळ शेत असुन जाण्या येण्याचे वादावरुन नेहमी भांडण होतात फिर्यादी ही तिचे पतीसह शेतात गेली असता यातील आरोपी यांनी संगनमत करुन अश्लिल शब्दात शिवीगाळ करुन गालावर थापड मारुन मारण्या पिटण्याची धमकी दिल्याने फिर्यादी यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन जवाहरनगर येथे कलम २९४,३२३,५०६,३४ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सफौ. कांबळे पोलीस स्टेशन जवाहरनगर हे करीत आहेत.

६) मोटार सायकलच्या धडकेत एक जखमी :–

दिंनाक २०/०३/२०१८ चे ११.३० वाजता दरम्यान यातील फिर्यादी राहुल सवापती मडावी वय २० वर्ष, रा. एसएम टेडर्स चे बाजुला खात रोड भंडारा हा आपला मित्र जखमी नायक धनीराम ऊईके वय २२ वर्ष, रा. वारको सिटी जवळ भंडारा हा शहापुर वरुन हात ठेल्यावरुन कबाडी चा सामान घेवुन जात असतांना यातील अज्ञात आरोपी चालकाने त्याचे ताब्यातील मोटार सायकल भरधाव वेगाने, निष्काळजीपणे चालवुन जखमीस मागेहुन एमआयटी कॉलेज एनएच ६ रोड शहापुर येथे धडक मारल्याने जखमी रोडवर पडुन त्याचे डोक्याला मार लागुन गंभिर जखमी झाल्याने व अपघाताची सुचना न देता पळुन गेल्याने फिर्यादी यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन जवाहरनगर येथे कलम २७९,३३८ भादवी. सहकलम १८४,१३४/१७७ मोवाका अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. साखरे पोलीस स्टेशन जवाहरनगर हे करीत आहेत.

७) औषधोपचारा दरम्यान इसमाचा मृत्यु :–

दिंनाक २०/०३/२०१८ चे ०५.०० वाजता दरम्यान यातील फिर्यादीचा साळा मृतक मनोहर अभिमन तिजारे वय ४५ वर्ष, रा. बेला बस स्थानक जवळ हा दिनांक १८/०२//०१८ चे ११.०० वाजता दरम्यान मुजबी शेत शिवार येथे ट्रॅक्टरने तुळीचे पेंडके आणण्यासाठी मजुरा सोबत गेला असता पेंडके दोरीने कसत असतांना दोर तुटुन तो ट्रॅक्टर वरुन जमीनीवर चित अवस्थेत पडल्याने त्याचे डोक्याला व मानेला मार लागल्याने त्यास औषधोपचारा करीता नागपुर येथील न्युरो हॉस्पीटल येथे नेले असता डॉ. ने मानेचे मनक्यावर शस्त्रकीया करुन देखील प्रकृतीत सुधारणा होत नसल्याने डॉ. ने घरी घेवुन जाण्यास सांगीतल्याने तेथुन भंडारा येथील स्पर्श मल्टी स्पेशालीटी येथे दिनांक १९/०३/२०१८ चे १८.३० वा. भरती केले असता उपचारा दरम्यान मरण पावल्याने, फिर्यादी ज्ञानेश्वर लक्ष्मण फेंडर वय ४४ वर्ष, रा. एकलारी यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम १७४ जाफौ. अन्वये मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा. गिन्हेपुंजे पोलीस स्टेशन भंडारा करीत आहेत.

८) आमरोड वर येणा–या जाणा–या वाहतुकीस व लोकांच्या जिवितास धोका निर्माण होईल अशा स्थितीत वाहन उभी करून मिळून आल्याने गुन्हा नोंद :–

दिनांक २०/०३/२०१८ चे १२.३० वाजता दरम्यान यातील आरोपी चालकाने त्याचे ताब्यातील ट्रॅक्टर हा बोरगाव ते पालोरा कडे जाणारा डांबरी रोड येथे आमरोडवर येणाऱ्या जाणाऱ्या वाहतुकीस व लोकांच्या जिवीतास धोका निर्माण होईल अशी उभी करुन मिळुन आल्याने सरतर्फे फिर्यादी पोहवा. गौतम यांचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन करडी येथे कलम २८३ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. गौतम पो.स्टे. करडी हे करीत आहेत

९) आमरोड वर येणा–या जाणा–या वाहतुकीस व लोकांच्या जिवितास धोका निर्माण होईल अशा स्थितीत वाहन उभी करून मिळून आल्याने गुन्हा नोंद :–

दिनांक २०/०३/२०१८ चे १६.०० वाजता दरम्यान यातील आरोपी चालकाने त्याचे ताब्यातील मिनी डोर ऑटो ही लाखनी मेन रबस स्थानक समोर एनएच ६ रोड येथे आमरोडवर येणाऱ्या जाणाऱ्या वाहतुकीस व लोकांच्या जिवीतास धोका निर्माण होईल अशी उभी करुन मिळुन आल्याने सरतर्फे फिर्यादी पो. शि. लांबट यांचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन लाखनी येथे कलम २८३ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपस पोहवा. हेमके पो.स्टे. लाखनी हे करीत आहेत

१०) आमरोड वर येणा–या जाणा–या वाहतुकीस व लोकांच्या जिवितास धोका निर्माण होईल अशा स्थितीत वाहन उभी करून मिळून आल्याने गुन्हा नोंद :–

दिनांक २०/०३/२०१८ चे १८.४५ वाजता दरम्यान यातील फिर्यादी हे पोलीस स्टॉपसह पेट्रोलींग करीत असता यातील आरोपी चालकाने त्याचे ताब्यातील ट्रक हा सन फ्लॅग गेट वरठी समोर डांबरी रोडचे मधोमध येणाऱ्या जाणाऱ्या लोकांना धोका निर्माण होईल अशा स्थितीत वाहन ऊभे करुन मिळुन आल्याने सरतर्फे फिर्यादी पोहवा. भोंदे यांचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन वरठी येथे कलम २८३ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. भोंदे पो.स्टे. वरठी हे करीत आहेत.

**११) अवैध दारु/ जुगार अडड्यांवर धाडी . :—**

दिनांक २०/०३/२०१८ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पोलीस स्टेशन मोहाडी, कारधा, पालांदुर, पवनी, भंडारा व लाखांदुर येथे अवैध दारु/जुगार अड्ड्यांवर धाडी घालुन एकुण ०७ गुन्हे दाखल करून आरोपीतांच्या ताब्यातुन ३३ लिटर हातभट्टी दारु+ ग्लास+ नगदी ३००/—रु. किंमती ४,७६०/—रु. ४ लिटर ३२०मिली लिटर देशी दारु किंमती १२००/—रु. तसेच जुगारातुन किंमती ८९५/—रु. असा एकुण किंमती ६,८५५/—रु. चा माल जप्त करण्यात आला.

**१२) मोटार वाहन कायदयाखाली कारवाई. :—**

दिनांक २०/०३/२०१८ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी मोटार वाहन कायदयाखाली एकुण १३९ प्रकरणांची नोंद करण्यात आलेली असून अवैध प्रवासी ६ त्यापैकी तीन सिटर वाहनाकरीता १५ ईतर वाहनांवरती — ११८ केसेस करण्यात आले आहे.

(मपोउपनि.प्रणती लांजेवार)
महिती कक्ष भंडारा
दुरध्वनी.क्र. ८८०५६५७२६२

**प्रति,**

**जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा**

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.